## आरोहण व्यवस्था :

गुड़मार एक लता आहे. आरोहन व्यवस्थे करिता बांस, लोखंडी एंगल आणि तारांचा उपयोग केला पाहिजे.

## सिंचाई :

उन्हाळयाच्या वेळेस 10–15 दिवस आणि हिवाळया मध्ये 20–25 दिवसाच्या काळात एक वेळा पानी देण्याची व्यवस्था केली असली तर यांच्या वाढीसाठी फायदा असतो.

## फसल सुरक्षा :

कांही वेळा जास्त पाऊसामुळे रोप पिवळे दिसायला लागतात. यांकरिता रोपे लावतांना 10 कि.ग्रा. फेरस सल्फेट चा प्रयोग केला पाहिजे.

## फसलेची तुड़ाई :

गुड़मार ची शेती मुख्यतः पाना करिता केली जाते. रोपणाच्या पहिल्या वर्षा पासून पाने येणे शुरू होते. काही दिवसानंतर लता वाढत असते आणि फसलचें उत्पन्न सुद्धा वाढते. गुड़मार ची फसल एकदा लावल्याने जवळ–जवळ 25–30 वर्षा पर्यंत देत असते. सिंचीत व्यवस्थेमध्ये दोन वेळा पाने तोड़ता येते. पहिल्यांदा सप्टेंबर–आक्टोबंर मध्ये व दूसऱ्यांदा एप्रिल–में महिण्यामध्ये. गुड़मार च्या परिपक्व व निवडलेल्या पानांना तोडल्या नंतर त्यांना सावली असलेल्या जागेवर वाळविले पाहिजे. ग्रीष्म ऋतु मध्ये लता पासून परिपक्व शेंगा एकत्रित करून वाळविल्या जातात. शेंगाना एकत्रित करतांना लक्ष्यात ठेवणे आवश्यक आहे कि शेंगा फुटून बियां उडू नये कारण बियांना कापूस लागलेला असतो. या प्रकारे दरवर्षी पानांना दोन वेळा तोडून प्रत्येक वर्षी तिसऱ्या वर्षा नंतर प्रत्येक रोपापासून जवळ–जवळ 5 कि.ग्रा. ओले पाने किंवा 1 कि.ग्रा. वाळलेली पाने प्राप्त होतात. एक हेक्टर मध्ये जवळ–जवळ 4–6 क्विंटल वाळलेली पाने प्राप्त होतात.

## संग्रहण काळ :

डिसेंबर–जानेवारी महिण्या मध्ये गुड़मारच्या पानांना निवडून एकत्र केले पाहिजे आणि मुळांना ग्रीष्म ऋतु मध्ये काढले पाहिजे.

## विनाश विहिन विदोहण प्रक्रिया :

डिसेंबर–जानेवारी महिण्यात गुड़मारच्या पानांना हातानी निवडून एकत्र केले पाहिजे. पानांना एकत्र करण्याकरिता रोपांना कापायला नको.

## पूर्ण उत्पन्न :

गुड़मारच्या शेती पासून शेतकऱ्यानां रूपये 25 ते 30 हजार प्रति हेक्टर उत्पन्न मिळू शकतो.


संकलन एवं संपादन :

डॉ. ए. के. पाण्डे

अनुवादक

डॉ. पी.बी. मेश्राम

वैज्ञानिक–ई

अधिक जानकारी के लिये संपके करें

निदेशक

उष्णकटिबंधीय वन अनुसंधान संस्थान

पो.आ. – आर.एफ.आर.सी., मण्डला रोड, जबलपुर – 482021

फोन : 0761–2840483, 4044002

वन विस्तार प्रभाग

उष्णकटिबंधीय वन अनुसंधान संस्थान

पो.आ. – आर.एफ.आर.सी., मण्डला रोड, जबलपुर – 482021

फोन : 0761–2840627



Amrit Offset # 2413943


# गुड़मार
## *(Gymnema sylvestre)*




उष्णकटिबंधीय वन अनुसंधान संस्थान

(भारतीय वानिकी अनुसंधान एवं शिक्षा परिषद)

डाकघर – आर.एफ.आर.सी., मण्डला रोड,

जबलपुर – 482 021 (म.प्र.)

# गुड़मार

(Gymnema sylvestre)

## ओळख -

जगात आढळणारे बहुमूल्य औषधीय रोपा मध्ये गुड़मार (बेडकी) एक बहुउपयोगी औषधीय रोप आहे. हा एस्कल लपीडेसी कुळाचा सदस्य आहे. याचा वनस्पतिक नांव *जिमनीमा सीलवेस्ट्री* आहे. गुड़मार चे पाने आणि मुळे औषधीय रूपामध्ये उपयोग केले जातात.

## वानस्पतिक विवरण -

गुड़मार बहुवर्षीय लता आहे. गुड़मारच्या फांद्यावर सुक्ष्म रोये आढळले जातात. पाने अभीमूखी मृदूरोमेश अग्रभागाच्या बाजूला नोकदार असतात. यावर पिवळया रंगाचे गुच्छेदार फुले आगस्त-सप्टेंबर महिण्यामधे उगवतात. गुड़मार चे फळ सरासरी 2 इंच लांब, कठोर असतात. यांच्या आंत बियांबरोबर कापूस लागलेला असतो आणि बियां लहान काळया-भुंज्या रंगाचा असतात.

## भौगोलिक विवरण -

गुड़मार भारताच्या वेगवेगळ्या भागात जसे मध्य भारत, पश्चिमी घाट, कोकण, त्रवणकोर क्षेत्राच्या दनांमध्ये आढळते. गुड़मार मध्यप्रदेशच्या वेगवेगळया वना मध्ये नैसर्गिक रूपाने काष्ठयुक्त रोयेदार लता च्या रूपात आढळणारी वनस्पति आहे.

## औषधीय उपयोग -

गुड़मारच्या पानांचा उपयोग मुख्यतः मधूमेह नियंत्रण औषधी तयार करण्या मध्ये केला जातो. याच्या उपयोगाने रक्तगत साखरेची मात्रा कमी होउ शकते. या बरोबर लघवी मधून साखर येणे स्वतः बंद होते. सर्प विषामध्ये गुड़मारच्या मुळांना वाटून त्यांचा अर्क पाजल्याने फायदा होतो. पाने आणि साल यांचा रस पोटात असलेले जन्तु मारणाच्या उपयोगात केला जातो. गुड़मार यकृताला उत्तेजित करतो आणि अप्रत्यक्ष रूपाने अग्नाशयला इन्सूलीन स्त्राव करणाऱ्या ग्रंथीला मदत करतो. मुळांचा उपयोग खोकला, हृदय रोग, जूने ज्वर, वात रोग आणि पांढरे धब्बे यांच्या उपचाराला केला जातो.

## रासायनिक संगठन -

पानांमध्ये जिम्नेमिक अम्ल फवेरसियल, एन्थ्रान्वोनोन जिम्नोसाइडस, सेपोनिन आणि कॅलसियम आक्जेलेट रसायन आढळतात.

## जमीन -

गुड़मारच्या शेतीला चांगल्या प्रकारची भूसभूसीत माती आवश्यक आहे. उन्हाळयात दोन वेळ आडवी उभी नांगरणी करून आणि पट्टा चालवून शेत तयार केले पाहिजे. पट्टा चालवून मातीला समतल केले पाहिजे.

## बियां -

बियांपासून शेती करण्या करिता रोपणी मध्ये रोपे तयार केले पाहिजे. बिया पेरण्याच्या अगोदर 3 ग्राम डायथेन, एम-45 किंवा बाविस्टीन नावाचे फफूंदनाशक ने बियांना उपचारित केले पाहिजे. उपचारित बियानां पॉलीथीन बॅग मध्ये पेरले पाहिजे. बियांना पेरणे आणि रोपणी तयार करण्याकरिता एप्रिल-में महिना चांगला असतो. जुलाई-आगस्ट महिण्या पर्यंत रोपे शेतात लावण्या योग्य होतात.

## कलमा पासून रोपे तयार करणे :

गुड़मार ची शेती जुन्या कलमा पासून रोपे तयार करून केली जाते. याकरिता जानेवारी-फेब्रूवारी महिना चांगला असतो. पॉलीथीन बैग मध्ये रोपे तयार करून जुलाई-आगस्ट महिण्या मध्ये शेतात लावले जातात. गुड़मार एक बहुवर्षीय लता आहे. ही जवळ-जवळ 20-30 वर्षा पर्यंत उत्पन्न देत असते.

## रोपण :

1 X 2 मी. च्या अंतरावर तयार असलेल्या गड्डया मध्ये पाऊस सुरू झाल्यानंतर जुलाई-आगस्ट महिण्यात रोपे लावले जातात. प्रति गड्डा 5 कि. शेण खात आणि 50 ग्राम निंबाची खळी टाकली पाहिजे. गुड़मारच्या शेतीला प्रति हेक्टर 10000 रोपांची आवश्यकता असते.